मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# भोसरी-चिंचवडमध्ये 'जगताप-लांडगे पॅटर्न'

## भोसरीतून आमदार महेश लांडगे पुन्हा मैदानात : चिंचवडमधून शहराध्यक्ष शंकर जगताप यांना संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्याच्या विधानसभा निवडणुकीत उमेदवारांची पहिली यादी भारतीय जनता पक्षाकडून जाहीर करण्यात आली आहे. भाजपाने ९९ उमेदवार जाहीर केले आहेत. चिंचवड विधानसभा मतदारसंघातून शहराध्यक्ष शंकर जगताप यांना उमेदवारी देण्यात आली आहे. तर अपेक्षेप्रमाणे भोसरी मतदारसंघातून महेश लांडगे यांच्याच नावावर पक्षाकडून शिक्कामोर्तब करण्यात आले आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदार अश्विनी जगताप यांच्या ऐवजी त्यांचे दीर भाजपा शहराध्यक्ष शंकर जगताप यांना पक्षाने उमेदवारी दिली आहे. नुकतंच अश्विनी जगताप यांनी



प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांची भेट घेत चिंचवडची उमेदवारी शंकर जगताप यांनाच द्यावी अशी मागणी देखील केली होती. त्याचप्रमाणे भोसरी विधानसभा मतदारसंघातून दोन वेळा आमदार राहिलेले महेश लांडगे यांना पक्षाने उमेदवारी जाहीर केली आहे.

चिंचवड विधानसभा मतदारसंघातून शंकर जगताप यांच्या विरोधात महाविकास आघाडीतून कोण उमेदवार असेल हे पाहणे महत्त्वाचं ठरणार आहे. तसेच भोसरी विधानसभेत आमदार महेश लांडगे यांच्या विरोधात महाविकास आघाडी कोणाला मैदानात उतरणार हे पाहणे देखील तितकेच उत्सुकतेचे ठरणार आहे.

---

# इस्त्रो 'स्पेस ऑन व्हिल्स' पिंपरी चिंचवड सायन्स पार्क मध्ये

## सुमारे 3000 विज्ञानप्रेमी प्रेक्षकांनी या अंतराळ प्रदर्शनाचा लाभ घेतला

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क येथे विज्ञान भारती (VIBHA) आणि इस्रो यांच्या संयुक्त विद्यमाने 'स्पेस ऑन व्हील्स' हे अंतराळ प्रगतीचा आढावा घेणारी व इस्रो द्वारा अंतरीक्ष विज्ञानामध्ये केलेल्या विविध विकास टप्प्यांचे महत्त्व दर्शविणारे प्रदर्शन १९ व २० ऑक्टोबर रोजी आयोजित करण्यात आले आहे.

या अंतरीक्ष प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी इस्रोचे ज्येष्ठ निवृत्त वैज्ञानिक व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे सहकारी अरुणकुमार सिन्हा, पिंपरी चिंचवड सायन्स पार्कचे संस्थापक-संचालक प्रवीण तुपे, इस्रोचे तांत्रिक सहायक हरीश कुमार, विज्ञान भारतीचे क्षेत्रीय समन्वयक श्रीप्रसाद, पुणे विभागीय सचिव डॉ. मानसी माळगावकर, कार्यकर्ते अमोल देशपांडे, विठ्ठल रायगावकर, चांदोरकर, पराग क्षीरसागर, अक्षय केळकर, वीणा माळगावकर तसेच विविध शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




### कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

- 'अंतराळ संशोधनाची ओळख: इस्रोच्या यशस्वी मोहिमांचे प्रतिकृती मॉडेल्स आणि संबंधित माहिती.
- शैक्षणिक उपक्रम: विद्यार्थ्यांना व्यावहारिक अनुभव देणारे क्रियाकलाप आणि स्पर्धा
- सर्वांसाठी खुला प्रवेश: हा उपक्रम विद्यार्थ्यांसह शिक्षक, विज्ञान प्रेमी आणि नागरिकांसाठी खुला आहे.
- 'कार्यक्रमात सहभागी शाळा आणि संस्थांना प्रशस्तीपत्रे प्रदान केली जातील.

सुमारे ३००० विज्ञानप्रेमी प्रेक्षकांनी या अंतराळ प्रदर्शनाचा लाभ घेतला. कार्यक्रमाचे संयोजन व आयोजन पिंपरी चिंचवड सायन्स पार्कच्या वैज्ञानिक अधिकारी सोनल थोरवे, मुख्य कार्यकारी अधिकारी नंदकुमार कासार, जनसंपर्क प्रभारी अस्मिता सावंत, सहायक शिक्षणाधिकारी सुनील पोटे यांनी केले.

---

# विधानसभा निवडणुकीसाठी मंगळवारपासून अर्ज दाखल करण्यास होणार सुरुवात..

## 4 नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार.., प्रचारासाठी मिळणार केवळ 13 दिवसांचा कालावधी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा निवडणुकीसाठी २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबर हा अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस आहे. यात शनिवार, रविवार अशा दोन सुट्या आल्याने अर्ज दाखल करण्यासाठी केवळ सहा दिवस मिळणार आहेत. त्यामुळे २८ व २९ ऑक्टोबरला अर्ज दाखल करण्यासाठी गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यानंतर प्रचारासाठी १३ दिवस मिळणार असल्याने मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी उमेदवारांची धावपळ होणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी शहरातील पिंपरी, चिंचवड आणि भोसरी मतदारसंघात २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात होणार आहे. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी दाखल करता येणार आहे. दि. २८ रोजी चौथा शनिवार, तर दि. २९ रोजी रविवार आहे. त्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करण्यास केवळ सहा दिवस मिळतील. ४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज मागे घेता येणार असून, त्याच दिवशी निवडणूक रिंगणात असलेल्या उमेदवारांची अंतिम यादी प्रसिद्ध होईल. शिवाय, त्याच दिवशी




उमेदवारांना निवडणूक चिन्हांचे वाटप होणार आहे. त्यानंतरच निवडणूक प्रचाराला खऱ्या अर्थाने सुरुवात होणार आहे. २० नोव्हेंबरला मतदान होणार असून, त्यापूर्वी १८ नोव्हेंबरला प्रचाराच्या तोफा थंडावतील. त्यामुळेच प्रचारासाठी उमेदवारांना केवळ १३ दिवस मिळणार आहेत.

मावळ मतदारसंघामध्ये ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणात आहे. गावोगावी पोहचण्यासाठी उमेदवारांना तारेवरची कसरत करावी लागणार आहे. तसेच शहर परिसरातील तिन्ही मतदारसंघ मोठे आहेत. मतदारसंघ पिंजून काढण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागणार आहे. तसेच या कालावधीत जाहीर सभाही मोठ्या प्रमाणात होणार आहे. त्यासाठी वेळ कमी मिळणार आहे. त्यातच पिंपरी- चिंचवड परिसरामध्ये राज्यभरातील नागरिक नोकरी आणि व्यवसायासाठी आले आहेत. ते दिवाळी सणासाठी गावाकडे आणार आहेत. त्यांच्याशी संपर्क करणे कठीण जाणार आहे.

आगामी २० नोव्हेंबरला होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने प्रशासन सतर्क झाले आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांच्या उपस्थितीत दिवसभरात आठ-दहा बैठका घेतल्या जात आहेत. निवडणुका शांततापूर्ण पारदर्शक वातावरणात पार पडाव्यात, याद्दष्टीने नियोजन केले जात असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

# जुनं ते सोनं...पण ठेकेदारासाठी!

## मनोरुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात ठेकेदाराला दिले कोट्यवधींचे सागवान लाकूड, लोखंड, घडीव दगड

**पुणे | प्रतिनिधी**

जुन्या गोष्टींचे मूल्य अधोरेखित करणारी 'जुनं ते सोनं' ही म्हण आपणा सर्वांना माहिती आहे. येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या पाडकामाचा मोबदला म्हणून तेथील जुन्या सागवान लाकडासह कोट्यवधी रुपयांच्या अनेक वस्तू बार्टर पद्धतीने ठेकेदाराला देण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे (पीडब्ल्यूडी) ठेकेदार कसे हुशार असतात, याचा प्रत्यय यानिमित्ताने आला. येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयाच्या जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात चक्क शंभर ते सव्वाशे वर्षांपूर्वीचे सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगड देण्याचा 'वस्तुविनिमय' पद्धत (बार्टर सिस्टीम) दिसून आली. "संबंधित ठेकेदारानेच हे जुने सागवान लाकूड आणि इतर वस्तू कामाचा मोबदला म्हणून मिळावा, यासाठी प्रयत्न केले होते. शिवाय पीडब्ल्यूडीतील अधिकाऱ्यांनाही त्यांचा 'मोबदला' मिळणार असल्याने याला संमती देण्यात आली," अशी चर्चा जोरात आहे. या बार्टरमुळे संबंधित ठेकेदार मालामाल झाला आहे.



### जुन्या लोखंडी खाटा, तांब्याची भांडी गायब

**»** येरवडा मनोरुग्णालयातील भांडार कक्षात अनेक जुन्या वजनदार लोखंडी खाटा होत्या. यासह तांब्याची भांडीही होती. या खाटा व तांब्याची भांडी कधी आणि कोणाला दिली, याचा पत्ता लागत नसल्याची चर्चा कर्मचारी वर्गामध्ये आहे. या वस्तूंची नोंद ठेवली असती तर वस्तू गेल्या नसत्या, असे त्यांचे म्हणणे आहे. शंभर वर्षांपूर्वीच्या ब्रिटीशकालीन अनेक मौल्यवान वस्तू गहाळ झाल्याचे समोर आले आहे.

बाजारभावाप्रमाणे सागवान लाकूड प्रतिघनफूट सहा ते नऊ हजार रुपये, लोखंड तीस ते चाळीस रुपये किलो तर घडीव एका दगडाची किंमत पाचशे ते सहाशे रुपये आहे. येरवडा मनोरुग्णालयाच्या जुन्या बांधकामातून शेकडो घनफूट सागवान लाकूड, काही टन लोखंड तर हजारो घडीव दगड संबंधित ठेकेदाराला मिळाले.

त्यामुळे या सर्व वस्तूंची किंमत बाजारभावाप्रमाणे काही कोटी रुपये होतात. हा फायदा ठेकेदाराला मिळवून देण्यासाठी संबंधित पीडब्ल्यूडीचे अधिकारी यांनी कशी युक्ती केली आहे, हे यानिमित्ताने दिसून आले.

### अभियंत्यांनी दिले संमतीचे पत्र

**»** सुरुवातीला येरवडा मनोरुग्णालयाचे अधीक्षक डॉ. सुनील पाटील यांनी संबंधित ठेकेदाराला भंगारमाल घेऊन जाऊ दिले नाही. मात्र, संबंधित ठेकेदाराला जुन्या इमारतीच्या पाडकामाच्या बदल्यात जुने सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगड देणार असल्याचे निविदेमध्ये नमूद केले आहे. त्यामुळे ठेकेदाराला ते घेऊन जाऊ द्या, असे लेखी पत्र सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता डॉ. सु. र. काटकर यांनी डॉ. पाटील यांना दिले. त्यानंतर ठेकेदार येथील काही ट्रक सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगड घेऊन गेला. अजूनही पाडकाम सुरू असून उर्वरित कामातील सागवान लाकडासह इतर वस्तूही ठेकेदार नेणार आहे.

येरवडा प्रादेशिक मनोरुग्णालयातील जुन्या इमारती पाडून त्या जागी नवीन इमारती बांधल्या जात आहेत. या इमारतीच्या पाडकामाचा ठेका नाशिक येथील एका ठेकेदाराला मिळाला आहे. मात्र, पाडकामाचा ठेका देताना ठेकेदाराला पैशांचा मोबदला न देता त्यांना पाडकामातील जुने सागवान लाकूड, लोखंड, तुळई, घडीव दगड देण्याची बार्टर सिस्टीम (वस्तुविनिमय पद्धत) पीडब्ल्यूडीचे अधिकारी आणि ठेकेदारांनी अमलात आणली. त्यामुळे शंभर वर्षांपेक्षा जास्त जुन्या इमारती पाडल्यानंतर त्यातून जुनं ते सोनं या उक्तीप्रमाणे निघालेला भंगार माल पाहून येथील कर्मचाऱ्यांचे डोळे पांढरे व्हायची वेळी आली. कारण जुने सागवान लाकूड, लोखंड आणि घडीव दगडाला आजही चांगली किंमत मिळते. हे सैनिकांसाठीचे रुग्णालय होते. या ठिकाणी रुग्णालय कक्षासह पन्नास ते साठ लहान व मोठ्या इमारती आहेत. या इमारतीच्या बांधकामात जास्तीत जास्त लाकूड व लोखंडाचा वापर केला गेला आहे. खिडक्या व दरवाजासाठी वापरलेले सागवान लाकूड, लोखंड चांगल्या दर्जाचे होते. त्यामुळे खिडक्या व दरवाजे मजबूत स्थितीत आजही आहेत. छतावरील पत्रे आजही सुस्थितीत आहेत.

---

# अग्नीशस्त्रे, हत्यारे, दारुगोळा बाळगण्यास प्रतिबंधात्मक आदेश जारी

## जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी आदेश जारी केले आहेत.

**पिंपरी | प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीची आदर्श आचार संहिता लागू झाली आहे. पुणे जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक शांततामय वातावरणांत व सुरळीतपणे पार पाडणे आवश्यक असल्याने शस्त्र अथवा हत्यारे, दारुगोळा यांचा गैरवापर होवून कोणताही अनुचित प्रकार घडू नये, मानवी जिवीत हानी तसेच सुरक्षिततेला व मालमत्तेला धोका पोहचू नये, सार्वजनिक शांतता बिघडू नये यासाठी डॉ.सुहास दिवसे,जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, पुणे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ व शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम १७(३) (ओ) व (बी) अन्वये त्यांना प्राप्त अधिकारानुसार कोणत्याही व्यक्तीस पुणे ग्रामीण जिल्हयात दिनांक २५



नोव्हेंबर,२०२४ रोजी २४-०० वाजेपर्यंत पर्यंत परवानाप्राप्त अग्नीशस्त्रे, हत्यारे, दारुगोळा बरोबर वाहून नेण्यास मनाई केली आहे.

बंदोबस्तासाठी असणारे अधिकारी/कर्मचारी तसेच बँका व सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी नेमण्यात आलेल्या सुरक्षा कर्मचारी यांना या आदेशातून वगळण्यात आले आहे. बँका अथवा सार्वजनिक संस्था यांनी निवडणूक कालावधीमध्ये त्यांचेकडील हत्यारांचा गैरवापर होणार नाही, याची दक्षता घेण्याची जबाबदारी संबंधित बँकेची/संस्थांची/अधिकाऱ्यांवर राहिल. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ति भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ मधील तरतूदीनुसार कारवाईस पात्र राहील असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

# हॉटेल, ढाबा आणि बेकरीमध्ये लाकूड व कोळश्याचा वापर करण्यास मनाई...

## महानगरपालिकेच्या 42 व्या वर्धापनदिनानिमित्त कार्यक्रमांचे आयोजन...

**पिंपरी | प्रतिनिधी**

बेकरी, हॉटेल, ढाबे आदी ठिकाणी कोळसा व लाकूड जाळल्याने होणारे वायूप्रदूषण कमी करण्यासाठी स्वच्छ इंधन म्हणून वीजेचा किंवा एलपीजीचा वापर करण्याबाबतच्या परिपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी महापालिका सभेत मान्यता दिली.




शहरातील वाढत्या लोकसंख्येबरोबरच इंधनाचा वापरही वाढला आहे. व्यावसायिक सर्व आस्थापना स्वयंपाकासाठी किंवा आगीसाठी लाकडाचा किंवा कोळश्याचा वापर करतात. हा वापर कमी करून हॉटेल, बेकरी, ढाबे यांद्वारे होणारे वायूप्रदूषण कमी करण्यासाठी लाकूड प्रतिबंधित करून फक्त लिक्विफाईड पेट्रोलियम गॅस (एलपीजी) किंवा नैसर्गिक वायू वापरणे किंवा पुरविणे याची सुनिश्चिती केली जाणार आहे. तसेच इंधन म्हणून लाकडाचा वापर टप्प्याटप्प्याने बंद करण्यासाठी कृती आराखडा देखील तयार करण्यात येणार आहे.

कोळसा व लाकूड जाळल्याने वायूप्रदूषण होऊन पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. त्यामुळे हवेत हानिकारक कण, कार्बन मोनोऑक्साईड आणि अस्थिर सेंद्रिय संयुगे आदी प्रदूषित घटकांचे प्रमाण वाढत आहे. परिणामी त्याचा नागरिकांच्या आरोग्यावर विपरित परिणाम होण्याची देखील शक्यता आहे. या सर्व बाबी लक्षात घेता लाकूड व कोळश्याचा वापर टप्प्याटप्प्याने बंद करून स्वच्छ इंधन म्हणून वीज किंवा एलपीजीचा वापर करणे याबाबतच्या परिपत्रकास प्रशासक शेखर सिंह यांनी आज मान्यता दिली.

# इंदिरा विद्यापीठ लवकरच कार्यान्वित होणार

## राज्य शासनाची स्थापनेला अधिकृत मंजुरी : अध्यक्षा डॉ. तरीता शंकर यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्य शासनाने इंदिरा विद्यापीठाच्या स्थापनेला अधिकृत मंजुरी दिली असून ही नवीन शैक्षणिक संस्था २०२५ मध्ये कार्यान्वित होणार आहे. हे विद्यापीठ राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय उच्च शिक्षणावर मोठी छाप टाकण्यास सज्ज आहे. या विद्यापीठात शैक्षणिक उत्कृष्टता, औद्योगिक समर्पकता आणि सांस्कृतिक एकात्मता यावर भर दिला जाणार आहे. इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटच्या अध्यक्षा आणि मुख्य मार्गदर्शिका डॉ. तरिता शंकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे याबाबत माहिती दिली आहे.



इंदिरा विद्यापीठ फार्मसी, मॅनेजमेंट, लिबरल आर्टस, कॉमर्स ॲण्ड इकॉनॉमिक्स, कॉम्प्युटर सायन्स आणि पीएचडी यासह विविध अभ्यासक्रमांमुळे ते उच्च शिक्षणासाठी सर्वसमावेशक केंद्र बनेल. विद्यापीठाचे अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरणच्या (एनईपी-२०२०) मार्गदर्शक तत्त्वांशी सुसंगत असेल. त्यामध्ये उदारमतवादी आणि कौशल्याधारित शिक्षणावर भर दिला जाईल. विद्यार्थ्यांना जागतिक करिअरसाठी आवश्यक अष्टपैलू कौशल्ये मिळतील.

> इंदिरा विद्यापीठ हे स्वतःला एक अग्रगण्य संस्था म्हणून जागतिक ८८ शैक्षणिक दर्जासाठी एक मजबूत पाया निर्माण करण्यास वचनबद्ध आहे.भारतातील कॉर्पोरेट, सामाजिक आणि औद्योगिक क्षेत्रात नेतृत्व विकसित करणे हा मुख्य उद्देश आहे. शिक्षण क्षेत्रात ३० वर्षांच्या वारशासह आम्ही नावीन्यपूर्ण शिक्षण मॉडेल ऑफर करण्यावर लक्ष केंद्रित करत आहोत. जागतिक संस्थांसोबत भागीदारी स्थापित करणे आणि देशातील आमच्या संबंधांना अधिक बळकटी देण्याचे ध्येय आहे.
>
> **- डॉ. तरिता शंकर, अध्यक्षा आणि मुख्य मार्गदर्शिका, इंदिरा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट**

**इंदिरा विद्यापीठाची वैशिष्ट्ये :**

औद्योगिक भागीदारी हे इंदिरा विद्यापीठाचे एक मुख्य वैशिष्ट्य ठरणार.

डिजिटल इनोव्हेशन,उद्योजकता, तंत्रज्ञानातील उदयोन्मुख क्षेत्रांतील करिअरसाठी उपयुक्त.

आघाडीच्या कंपन्यांशी घनिष्ठ संबंध-सहकार्य प्रस्थापित केले जाणार.

इंटर्नशिप, प्लेसमेंट आणि संशोधन प्रकल्पांच्या संधी निर्माण होण्याची अपेक्षा

आंतरराष्ट्रीय विद्यापीठांसोबत जागतिक सहकार्यावरही विद्यापीठाचा भर राहणार

भारतीय संस्कृती आणि भारतीय ज्ञान प्रणालींमध्ये विशेष अभ्यासक्रम

# भोसरी माझी आई, तर चऱ्होली मावशी..!

## आमदार महेश लांडगे यांचा विजयाचा निर्धार : माजी महापौर नितीन काळजे यांच्यासह ग्रामस्थांची वज्रमूठ

**पिंपरी | प्रतिनिधी**

"जन्मदाती आईनंतर जास्त प्रेम देते, आपुलकीने जपते, जगायला शिकवते ती मावशी म्हणूनच भोसरी माझी आई; तर चऱ्होली माझी मावशी आहे. माझ्या राजकीय वाटचालीमध्ये चऱ्होलीकरांनी कायम साथ दिली. माझे जीवाभावाचे सहकारी यांच्या सोबतीने चऱ्होलीतील ग्रामदैवत श्री. वाघेश्वर महाराज यांचा आशिर्वाद घेतला आणि निवडणूक प्रचाराला सुरुवात करण्यात आली. "जब साथ हो मेरे दोस्त...तो संघर्षपथपर विजय निश्चित हैं..! " याची अनुभूती येते आहे. अत्यंत सकारात्मक-मंगलमय वातावरणात निवडणुकीचा प्रचार सुरू आहे", अशा भावना भाजपा आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या आहेत.



भोसरी विधानसभा निवडणुकीच्या निमित्ताने आमदार लांडगे यांनी चऱ्होली गावचे ग्रामदैवत श्री. वाघेश्वर महाराज मंदिरात दर्शन घेवून प्रचाराला सुरूवात केली. यावेळी माजी महापौर नितीन काळजे, माजी महापौर राहुल जाधव आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

माजी महापौर नितीन काळजे म्हणाले की, आम्ही महेश लांडगेंसोबत २०१४ साली गेलो. त्यावेळी कोणतीही अपेक्षा न ठेवता गेलो होतो. महानगरपालिकेत पहिल्यांदा भाजपाची सत्ता आली. २०१७ मध्ये मला महापौरपदाची संधी मिळाली. मी नितिमत्ता जपणारा माणूस आहे. चऱ्होलीला, मला एव्हढे मोठे पद महेश लांडगे यांच्यामुळेच मिळाले.

महापालिकेत चऱ्होली गावचा समावेश झाला. १७ वर्षे साधा डीपी रस्ता करता आला नाही. पूर्वीची परिस्थिती काय होती, हे चऱ्होलीकरांना माहिती आहे. २०१७ मध्ये आमदार महेश लांडगेंच्या माध्यमातून चऱ्होली गावाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला. विकासाच्या बाबतीत चऱ्होलीचे नाव पंचक्रोशीत निघते. त्यामुळे २०१४ मध्ये ज्याप्रमाणे चऱ्होली निर्णायक ठरली, तसेच २०२४ मध्येसुद्धा चऱ्होलीकर निर्णायक भूमिका बजावतील. या परिसरातून महेश लांडगे यांना सर्वाधिक मतदान होईल, असा दावाही माजी महापौर नितीन काळजे यांनी केला आहे.

> माझ्या राजकीय संघर्षाच्या काळात चऱ्होलीकरांनी दिलेला आधार कदापि विसरु शकत नाही. विकासाच्या मुद्यांवर आम्ही निवडणुकीला सामोरे जात आहे. गेल्या १० वर्षांत चऱ्होलीसह समाविष्ट गावांच्या विकासाला चालना दिली. समाविष्ट गावांमध्ये दोन महापौरांसह विविध मानाची पदे दिली. भूमिपुत्रांना न्याय मिळण्यासाठी प्रयत्न केले आहेत. चऱ्होलीतील भूमिपुत्र बांधकाम व्यावसायिक घडले. याचा अभिमान वाटतो. रस्ते, पायाभूत सोयी-सुविधा निर्माण झाल्या. त्यामुळे चऱ्होलीचा चेहरामोहरा बदलला आहे. मतदार संघातील नागरिकांना अभिमान वाटावा, असे काम करीत राहीन.
>
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा, पिंपरी-चिंचवड.**



# फर्ग्युसन रस्ता परिसरातील बंगल्यात चंदन चोरी

## बंगला मालकाला दगड भिरकावून मारण्याची धमकी : सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात चंदन चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. फर्ग्युसन रस्ता परिसरातील एका बंगल्यात शिरलेल्या बंगला मालकाला दगड भिरकावून मारण्याची धमकी देऊन चंदनाचे झाड कापून नेले. दोन महिन्यांपूर्वी प्रभात रस्त्यावरील एका बंगल्यात शिरलेल्या चोरट्यांनी वकील महिलेला शस्त्राचा धाक दाखवून चंदन चोरी केली होती. चंदन चोरट्यांनी आता थेट नागरिकांना धमकावण्यास सुरुवात केल्याने सुरक्षितेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

याबाबत आर्यन शिरोळे (वय २३) यांनी डेक्कन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फर्ग्युसन महाविद्यालयासमोर असलेल्या शिरोळे रस्त्यावर शिरोळे यांचा शिवराई बंगला आहे. २ ऑक्टोबर रोजी पहाटे साडेचार वाजण्याच्या सुमारास त्यांना बंगल्यातील चंदनाचे झाड कापण्याचा आवाज आला. त्यानंतर ते बंगल्याच्या आवरात आले. तेव्हा तीन ते चार चोरटे चंदनाचे झाड करवतीने कापत होते. त्यांनी आरडाओरडा केला. तेव्हा चोरट्यांनी त्यांना दगड भिरकावून मारण्याची धमकी देऊन आरडाओरडा करू नका, असे सांगितले. आरडाओरडा केल्यास दगड मारेल, असे सांगितले. त्यानंतर चंदनाचे झाड कापून चोरटे अंधारात पसार झाले. पोलीस उपनिरीक्षक महेश भोसले तपास करत आहेत.



### चंदन चोरट्यांना पकडण्यात पोलिसांना अपयश

» आठवड्यापूर्वी विधी महाविद्यालय रस्त्यावरील एका सोसायटीत शिरलेल्या चोरट्यांनी चंदनाचे झाड कापून नेल्याची घटना घडली होती. शहरातील सोसायटी, शासकीय कार्यालय, शैक्षणिक संस्थांच्या आवारातून चंदनाची झाडे कापून नेण्याच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. मुकुंदनगर, मार्केट यार्ड, प्रभात रस्त्यावरील सोसायटीत शिरुन चोरट्यांनी चंदनाची झाडे कापून नेली होती. चोरट्यांनी वकील महिलेला शस्त्राचा धाक दाखवून चंदनाचे झाड कापून नेले. खडकीतील दारुगोळा कारखान्याच्या आवारातून चंदनाचे झाड कापून नेण्यात आले. चंदन चोरीच्या घटना वाढत असून, चोरट्यांना पकडण्यात पोलिसांना अपयश आले आहे.

# बटाटा, गवार, मिरची, घेवड्याच्या भावात वाढ

## राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे 90 ट्रक फळभाज्यांची आवक

**पुणे | प्रतिनिधी**

गुलटेकडी येथील मार्केटयार्डातील तरकारी बाजारात राज्यासह परराज्यांतून येणारी फळभाज्यांची आवक मागील आठवड्यांच्या तुलनेत वाढली आहे. मात्र मागणीच्या तुलनेत आवक कमी असल्याने बटाटा, गवार, हिरवी मिरची, शिमला मिरची, बीट आणि घेवड्याच्या भावात वाढ झाली असून अन्य सर्वच फळभाज्यांचे भाव स्थिर आहेत.

गुलटेकडी मार्केटयार्डमध्ये रविवारी (ता. २०) राज्याच्या विविध भागांसह परराज्यांतून सुमारे ९० ट्रक फळभाज्यांची आवक झाली. विविध भाजीपाल्यांच्या आवकेमध्ये परराज्यांतून कर्नाटक आणि गुजरात येथून हिरवी मिरची ७ ते ८ टेम्पो, कर्नाटक आणि गुजरात येथून कोबी ३ ते ४ टेम्पो, कर्नाटकातून पावटा २ टेम्पो, आंध्रप्रदेश, तमिळनाडू येथून शेवगा ३ ते ४ टेम्पो, इंदौर येथून ५ ते ६ टेम्पो गाजर, कर्नाटक आणि गुजरात येथून घेवडा ३ ते ४ टेम्पो, गुजरात येथून ३ टेम्पो भुईमुगाच्या शेंगा, मध्यप्रदेशातून लसूण सुमारे ७ ते ८ टेम्पो इतकी आवक झाली होती.

तर स्थानिक भागातून झालेल्या आवकेमध्ये सातारी आले सुमारे ४०० ते ५०० गोणी, भेंडी ५ ते ६ टेम्पो, गवार ५ ते ६ टेम्पो, टोमॅटो सहा ते साडेसहा हजार क्रेट, हिरवी मिरची २ ते ३ टेम्पो, काकडी ७ ते ८ टेम्पो, फ्लॉवर ७ ते ८ टेम्पो, कोबी ४ ते ५ टेम्पो, सिमला मिरची ७ ते ८ टेम्पो, भुईमुगाच्या शेंगा ४०-५० गोणी, मटार पुरंदर, पारनेर, वाई आणि सातारा परिसरातून ४० ते ५० गोणी, तांबडा भोपळा ८ ते १० टेम्पो, कांदा सुमारे ७० ते ८० ट्रक, इंदौर, आग्रा, स्थानिक भागातून बटाटा ३५ ते ४० टेम्पो आवक झाली होती, अशी माहिती मार्केट यार्डमधील ज्येष्ठ आडतदार विलास भुजबळ यांनी दिली.

### पालक, पुदिन्याच्या भावात वाढ

बाजारात मागील आठवड्याच्या तुलनेत कोथिंबीर, मेथी, अंबाडी, पालक आणि पुदिन्याच्या भावात वाढ झाली असून शेपू, कांदापात, चुका आणि चवळईच्या भावात घट झाली आहे. चाकवत, करडई, मुळा आणि राजगिऱ्याचे भाव स्थिर असल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.

गुलटेकडी मार्केटयार्डातील घाऊक बाजारात रविवारी (ता. २०) कोथिंबिरीच्या सुमारे ८० हजार जुडी तर मेथीची ५० हजार जुडींची आवक झाली होती. घाऊक बाजारात कोथिंबीर आणि मेथी प्रत्येकी प्रतिगड्डीस पाच रुपये, पालक तीन रुपये, पुदीना दोन रुपये आणि अंबाडी एक रुपयांनी महागली आहे तर शेपू आणि कांदापातीच्या भावात प्रत्येकी तीन रुपयांनी घट झाली आहे तर चुका दोन रुपये आणि चवळई एक रुपयाने स्वस्त झाली आहे.

### पालेभाज्यांचे शेकड्यातील भाव

कोथिंबीर : १०००-२०००, मेथी : १५००-२५००, शेपू : ८००-१२००, कांदापात : ८००-१५००, चाकवत : ६००-८००, करडई : ४००- ७००, पुदिना : ५००-१०००, अंबाडी : ५००-८००, मुळा : ८००-१५००, राजगिरा : ४००- ७००, चुका : ५००-८००, चवळई : ३००-७००, पालक : १०००-१८००.

### डाळिंब, पपई, पेरूच्या भावात घट

डाळिंब, पपई आणि पेरूच्या भावात घट झाली असून लिंबू, कलिंगड आणि खरबुजाच्या भावात वाढ झाली असून अननस, संत्री, मोसंबी, सीताफळ आणि चिक्कूचे भाव स्थिर होते.



### फळभाज्यांचे दहा किलोचे भाव :

» कांदा नवीन : २५०-३५० जुना : ४००-४५०, बटाटा : २५०-३७०, लसूण : २०००- ३३००, आले सातारी: ५००-१०००, भेंडी : ३००-४००, गवार : ५००-७५०, टोमॅटो : ३००-५००, दोडका : ३००-४००, हिरवी मिरची : ४००-६००, दुधी भोपळा : १००-२५०, चवळी : ३००-४००, काकडी : १२०-१६०, कारली : हिरवी ३००-३५०, पांढरी : २००-२५०, पापडी : ५००-६००, पडवळ : २००-३००, फ्लॉवर :२५०-३००, कोबी : १२०-१८०, वांगी : ३००-४००, डिंगरी : ४००-५००, नवलकोल : १२०-१४०, ढोबळी मिरची : ७००-७५०, तोंडली : कळी : ३००-४००, जाड :१५०-१८०, शेवगा : ७००-८००, गाजर : २५०-३५०, वालवर : ५००-६००, बीट : ३००-३५०, घेवडा : ७००-९००, कोहळा : १००-१५०, आर्वी: २००-२५०, घोसाळे : २००-२५०, ढेमसे : ३००-३५०, भुईमूग शेंगा : ४५०- ६००, मटार : स्थानिक : १४००-१५००, पावटा : ५००-६००, तांबडा भोपळा : १००-१५०, सुरण : १८०-२००, मका कणीस : ५०-१००, नारळ (शेकडा) : १०००- १६००.